डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकरण योजना

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्यांक विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : अविवि - २०१५ /प्र. क्र. १५२ /१०/का -६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई - ४००० ०३२
दिनांक : २८ डिसेंबर २०१५

वाचा : - १) शासन निर्णय क्रमांक : अविवि - २०१० /प्र. क्र. १५२ /१०/का -६
दिनांक : ११ ऑक्टोबर, २०१३.

परिपत्रक :-

राज्यातील नोंदणीकृत मदरशांसा आधुनिकीकरणासाठी डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकरण योजना दि. ११/१०/२०१३रोजीच्या शासन निर्णयाव्दारे कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेअंतर्गत राज्यातील नोंदणीकृत मदरसांना पायाभूत सुविधा आणि विषय शिक्षकांच्या वेतनाकरिता सहाय्यक अनुदान शासनाकडून दिले जाते.

तथापि या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार जे मदरसे धर्मादाय आयुक्त किंवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत आहेत, त्यांना सदर योजनेचा लाभ दयावा की मदरसा चालविणाऱ्या संस्था धर्मादाय आयुक्त किंवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत आहेत त्यांना लाभ दयावा याबाबत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वारंवार विचारणा करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे स्पष्ट करण्यात येते की, "मदरसा चालविणारी संस्था अथवा मदरसा, धर्मादाय आयुक्त किंवा वक्फ बोर्ड येथे नोंदणीकृत असल्यास त्यांना सदर योजनेसाठी पात्र समजण्यात यावे.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलबध असून त्यांचा संगणक संकेतांक २०१५१२३११६५२१७८३१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ainul C Attar

Digitally signed by Ainul C Attar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ainul C Attar
Date: 2015.12.31 16:54:46 +05'30'

(अैनुल अत्तार)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

५. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग मंत्रालय, मुंबई.

६. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग. मंत्रालय, मुंबई

७ महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर

८ महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा) , मुंबई / नागपूर

९ सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१० सर्व जिल्हाधिकारी

११ सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

१२ सर्व जिल्हा नियोजन अधिकारी

१३ सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

१४ सर्व संबंधित मदरसा (जिल्हाधिकांऱ्यामार्फत)

१५ निवडनस्ती.